# Media Coverage

लोकमत हॅलो नांदेड
बुधवार ११.१२.२०२४
https://epaper.lokmat.com

## 'ऑक्सफर्ड'मध्ये कॉफी @ ऑक्सफर्डचे आयोजन



लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल वाडी (बु) येथे कॉफी @ आक्सफर्डचे शंका समाधान चर्चा सत्र पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भाऊराव चव्हाण साखर कारखाना येळेगावचे उपाध्यक्ष नरेंद्र चव्हाण, मनपा शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी, जि.प.चे शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे, हिंगोलीचे जिल्हा क्रीडा अधिकारी नीळकंठ श्रावण, उपस्थित होते. कॉफी @ आक्सफर्डच्या शंका समाधानाच्या चर्चा सत्रात विद्यार्थ्यांनी विविध विषयावरील प्रश्न उपस्थित केले. त्यामध्ये मुलांनी दहावी नंतर कोणते क्षेत्र निवडावे, तसेच अभ्यासामध्ये लक्ष कसे केंद्रीत करावे, शैक्षणिक क्षेत्रात अल्पसंख्याकांना आरक्षण असावे का? असे विविध प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे नरेंद्र चव्हाण यांनी दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन शौर्य प्रसाद सिंग, सानवी चौधरी व मनस्वी शिंदे यांनी केले. (वाणिज्य वार्ता)

गोदातीर समाचार
बुधवार, दि. १५ मे २०२४

## सीबीएसई बोर्डाच्या दहावी परिक्षेत ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलची भरारी



नांदेड- दि. १३ मे रोजी सीबीएसई बोर्डाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३- २४ चा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला. येथील ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल वाडी बु. या शाळेने या परीक्षेत घवघवीत यश मिळविले.

अनय पांडे ९६.२ टक्के, सुमेध पिंपरवार ९६ टक्के, शरयु शिंदे ९५.६ टक्के, व गौरव चितलवार ९५.६ टक्के गुण घेऊन हे विद्यार्थी अव्वल ठरले आहेत. शाळेतील २१ विद्यार्थी ९० टक्के व ३७ विद्यार्थी ८० टक्के च्या वर गुण घेऊन उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव, सचिव बाबासाहेब पाटील व सहसचिव अविनाश जाधव यांनी शाळेच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व तसेच मुख्याध्यापिका, प्राथमिकचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, वर्गशिक्षक, अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रजावाणी
बुधवार, दि. १५ मे २०२४

## दहावीच्या परीक्षेत ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलचे सुयश



नांदेड, दि. १४ : ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल वाडी (बु.) नांदेड या शाळेने सीबीएसई बोर्डच्या दहावी परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे.

दि. १३ मे रोजी सीबीएसई बोर्डाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला. यात ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल वाडी (बु.) या शाळेचा निकाल लागला असून शाळेतील अनय कविता गिरीष पांडे ९६.२%, सुमेध अंजली महेश पिंपरवार ९६%, कु. शरयु महानंदा देविदास शिंदे ९५.६% व गौरव स्मिता संतोष चिंतलवारने ९५.६ % गुण घेऊन शाळेतून अव्वल ठरले आहेत. शाळेतील २१ विद्यार्थी ९०% व ३७ विद्यार्थी ८०% च्या वर गुण घेऊन उत्तीर्ण झाले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब जाधव (माजी राज्यमंत्री), सचिव बाबासाहेब पाटील (आमदार) व सहसचिव अविनाश जाधव यांनी शाळेच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच मुख्याध्यापिका, प्रा. मु. अ. पर्यवेक्षक, वर्गशिक्षक, अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व कौतूक केले. पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## Media Coverage

# प्रजावाणी

नांदेड • गुरुवार, दि. १२ डिसेंबर २०२४

### ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलमध्ये रक्तदान शिबिर



नांदेड : ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल वाडी (बु) नांदेड येथील शाळेचे संस्थापक बाळासाहेब जाधव, माजी राज्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दि. १० डिसेंबर २०२४ रोजी प्रस्तुत शाळेच्या प्रांगणात रक्तदान शिबिराचा कार्यक्रम घेण्यात आला. श्री हजुर साहेब ब्लड बँक, नांदेड ब्लड बँकेने हे शिबिर घेतले. शाळेतील अॅडमिनिस्ट्रेटीव्ह ऑफीसर रवी हिवरे यांनी बाळासाहेब जाधव यांच्या कार्याविषयीची माहिती दिली. रक्तदान केलेल्या कर्मचाऱ्यांना श्री हजुर साहेब ब्लड बँकेतर्फे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या प्राचार्य, उपप्राचार्य, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# प्रजावाणी

नांदेड • बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४

### ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलमध्ये वाचन प्रेरणादिवस



नांदेड : ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल वाडी (बु) नांदेड येथील शाळेमध्ये माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या प्राचार्या उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देविदास तारु यांची उपस्थिती होती. प्रथम मान्यवरांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेच्या प्राचार्यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. शाळेतील ९वी ड मधील विद्यार्थिनी कु. संस्कृती चव्हाण हिने डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बद्दल माहिती सांगितली. प्रमुख पाहुण्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आरुषी शिंदे हिने केले.

# प्रजावाणी

शनिवार, दि. १७ ऑगस्ट २०२४

### ऑक्सफर्ड स्कूलकडून मूक अभिनय स्पर्धा



नांदेड : शहरातील ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल वाडी (बु.) या शाळेच्या वतीने आंतरशालेय मुक अभियान स्पर्धेचे आयोजन गुरुवारी (दि.१५) करण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षण चित्रपट दिग्दर्शक रोहन पंडित, समीर सोनसळे यांनी केले. दरम्यान विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गावून पाहुण्यांचे स्वागत केले. मूक अभिनय स्पर्धा सतत व्हाव्यात व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सुप्त गुणांना वाव द्यावा, असे आवाहन पाहुण्यांनी केले. या स्पर्धेत शहरातील अनेक शाळांनी सहभाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना रोख रकमेसह प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.